# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : ९३५२८ / मराठी भाषा समिती (ड-१७)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ७ ऑक्टोबर, २०२०.

**: : प रि प त्र क : :**

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांना विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सध्याच्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण देशात काही निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत "वाचन प्रेरणा दिन" साजरा करताना जास्तीत जास्त कार्यक्रम/चर्चासत्र/प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावे. तसेच मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी डिजीटल माध्यमाचा जास्तीत जास्त वापर करणे, सर्व संस्थांनी सोशल मिडियावर "मराठी वाचन कट्टा" ची निर्मिती करणे, विकिपिडीया सारख्या माध्यमावर मराठीत जास्तीत जास्त लेखन होण्याकरिता यासंबंधीच्या कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात अशा शासनाकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संबंधातील मराठी भाषा विभागाकडून प्राप्त झालेला शासन निर्णय तसेच मराठी भाषा विभागाकडून मराठी भाषा समितीला प्राप्त होणारे सर्व शासन निर्णय/परिपत्रके वेळोवेळी महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावरील मराठी भाषा समिती सदराखाली उपलब्ध करुन देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(राजेन्द्र भागवत)
सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१. दोन्ही सभागृहांचे सर्व सन्मा.सदस्य.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
६. संगणक कक्ष (Website)